मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

***Re- ACCREDITED WITH 'A' GRADE BY NAAC***

दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१२ रोजी झालेल्या
अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

●

Minutes of the Ordinary Meeting of the Senate
held on 05th October, 2012.

मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

***Re- ACCREDITED WITH 'A' GRADE BY NAAC***

दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१२ रोजी झालेल्या
अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

•

Minutes of the Ordinary Meeting of the Senate
held on 05th October, 2012.

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र.१-२०१२ -२०१३

अधिसभा
५ ऑक्टोबर, २०१२

अधिसभेची सर्वसाधारण सभा विद्यापीठाचे सर कावसजी जहांगीर सभागृह (दीक्षांत सभागृह), येथे शुक्रवार दिनांक ५ ऑक्टोबर, २०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली सभेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते -

१. डॉ. राजन वेळूकर (*कुलगुरू*)
२. डॉ. नरेश चंद्र, (प्र-कुलगुरू)
३. डॉ. (श्रीमती) एम्. एस्. मोलवणे
४. प्राचार्य (डॉ.) राजपाल एस्. हांडे
५. श्री. मृदुळ निळे
६. डॉ. (श्रीमती) प्रतिभा ए. गोखले
७. डॉ. दिलीप एस्. पाटील
८. प्राचार्य रविंद्रन कर्थाडी
९. प्राचार्य गोरक्ष व्ही. पारगावकर
१०. प्राचार्य नारायण एम्. राजाध्यक्ष
११. प्राचार्य विष्णू एन्. मगरे
१२. प्राचार्य (श्रीमती) अॅन्सी जोस
१३. प्राचार्य दत्ताजीराव वाय. पाटील
१४. प्राचार्य (श्रीमती) चैताली टी. चक्रवर्ती
१५. प्राचार्य विठ्ठल बी. रोकडे
१६. प्राचार्य (श्रीमती) कमला बालसुब्रमन्यम्
१७. प्राचार्य (श्रीमती) हर्षा के. मेहता
१८. प्राचार्य (श्रीमती) प्रमिला एस्. राऊत
१९. प्राचार्य सिद्धेश्वर टी. गडदे
२०. श्री. हसमुख डी. रांभीया
२१. श्री. संजय बी. शेटे
२२. श्री. भिकू आर. इदाते
२३. श्री. कुमार खैरे, (सदस्य सचिव)

२४. डॉ.(श्रीमती) मोहसिना मुकादम
२५. डॉ. जालिंदर अडसुळे
२६. डॉ. आद्याप्रसाद पांडे
२७. डॉ. हेमंत एम्. पेडणेकर
२८. डॉ. (श्रीमती) मधू एस्. परांजपे
२९. डॉ.(श्रीमती) संगिता ए. गोडबोले
३०. डॉ. बिंदूप्रकाश बी. मिश्रा
३१. डॉ. संजय कुमार
३२. डॉ. (श्रीमती) अनुराधा मझुमदार
३३. डॉ. विवेक बी. देशमुख
३४. डॉ. अभय एन्. बांबोले
३५. डॉ. प्रल्हाद जी. पवार
३६. डॉ. दिपक जी. बीडवई
३७. डॉ. (श्रीमती) माधवी एस्. निकम
३८. डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद
३९. डॉ.(श्रीमती) अनुपमा जे. सावंत
४०. डॉ. वसंत एस्. शेकडे
४१. डॉ. विजय एन्. पवार
४२. श्री. प्रकाश बिनसाळे
४३. श्री. गजाजन (उर्फ) दिलीप ए. करंडे
४४. श्री. महादेव बी. जगताप
४५. श्री. प्रदीप बी. सावंत
४६. श्री. सुधाकर एस्. तांबोळी
४७. श्री. गणेश एस्. चव्हाण
४८. श्रीमती निलीमा एन्. भुर्के
४९. श्री. संजय टी. वैराळ
५०. श्री. तुषार व्ही. कुमारे
५१. श्री. शशिकांत के. झोरे
५२. श्री. राजन व्ही. कोळंबेकर
५३. प्राचार्य मुरलीधर जी. चांदेकर
५४. प्रा. अंबादास वाय. मोहिते
५५. श्री. प्रकाश व्ही. पागे
५६. श्री. सलीम बी. पटेल
५७. प्रा.(श्रीमती) रुपा शहा
५८. डॉ. राजन एम्. तुंगारे

५९. डॉ. (श्रीमती) शुभदा ए. जोशी
६०. डॉ. प्रल्हाद जी. जोगदंड
६१. डॉ. (श्रीमती) माधुरी के. पेजावर
६२. डॉ. सुरेश के. उकरंडे
६३. डॉ. टी. पी. मधू नायर
६४. डॉ. बाळकृष्ण व्ही. भोसले
६५. डॉ. गंगाधर ए. मेश्राम
६६. डॉ. (श्रीमती) सुनिता व्ही. मगरे
६७. डॉ. (श्रीमती) शेफाली आर. पंडया
६८. डॉ. रामभाऊ एम. बडोदे

सभेची सुरूवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

कुलगुरूंनी स्वतःच्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून स्वागत केले.

यानंतर कुलगुरूंनी सभागृहास सांगितले की, प्राचार्य (श्रीमती) मंजु निचाणी, डॉ. कृष्णा पाटील, श्री. महेश म्हात्रे, श्री. वसंतरावजी ओस्वाल व प्राचार्य मारोती भगत यांनी कळविले आहे की, ते या सभेस उपस्थित राहू शकणार नाहीत आणि त्यांना या सभेत अनुपस्थित राहण्यास परवानगी द्यावी, अशी त्यांनी विनंती केली आहे.

अधिसभेने प्राचार्य (श्रीमती) मंजु निचाणी, डॉ. कृष्णा पाटील, श्री. महेश म्हात्रे व श्री. वसंतरावजी ओस्वाल या सन्माननीय सदस्यांची अधिसभेस अनुपस्थित राहण्याची विनंती मान्य केली.

श्री. जी. एल. अभ्यंकर, श्री. एम. एन. काणे, श्रीमती बेबीताई कांबळे, श्री. प्रकाश मोहाडीकर, प्रा. राम बापट, श्री. दारासिंग रंधावा, श्री. राजेश खन्ना, श्री. बाळासाहेब श्रीपती तथा बाळ पळसुले, प्रा. स. पां. देशपांडे, श्री. मनोहर बोर्डेकर, श्री. बाबासाहेब कुपेकर, श्रीमती काशिबाई बाबुराव शेटे, श्री. वासुदेव श्रीनिवास पंडित व श्रीमती प्रमिला वासुदेव पंडित, श्री. भालचंद्र अनंत जोशी, श्रीमती पार्वती भगवान खैरे, श्री. दिग्विजय खानविलकर, श्री. विलासराव देशमुख, श्री. प्रभाकर कुंटे, पं. मनोहरराव चिमोटे, डॉ. व्हर्गिस कुरियन, श्री. भालचंद्र अनंत जोशी, श्रीमती. मृणालताई गोरे, श्री. शंकरराव जगताप, श्री. ए. के. हंगल, यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त करुन त्यांना पुढील शब्दात श्रध्दांजली वाहिली.

➢ श्रध्दांजली :-

## श्री. जी. एल. अभ्यंकर

मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू श्री. जी. एल. अभ्यंकर यांचे दु:खद निधन झाले. श्री. अभ्यंकर हे सन १९८६ ते १९८९ या काळात मुंबई विद्यापीठात प्र-कुलगुरू या पदावर कार्यरत होते.

## श्री. एम. एन. काणे

मुंबई विद्यापीठाचे माजी उपकुलसचिव व माजी प्रभारी कुलसचिव श्री. एम. एन. काणे यांचे दि. ७ एप्रिल, २०१२ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते.

## श्रीमती बेबीताई कांबळे

दलित चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या आणि साहित्यिका श्रीमती बेबीताई कांबळे यांचे दि. २३ एप्रिल, २०१२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८२ वर्षांच्या होत्या. श्रीमती बेबीताई कांबळे यांना शासनातर्फे 'दलितमित्र' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते.

## श्री. प्रकाश मोहाडीकर

आंतरभारतीची संकल्पना मांडून त्या संकल्पनेचा ध्यास घेतलेले ज्येष्ठ स्वांतत्र्यसैनिक, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि माजी आमदार श्री. प्रकाश मोहाडीकर यांचे दि. १९ मे २०१२ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

## प्रा. राम बापट

ज्येष्ठ विचारवंत व पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक रामचंद्र तथा राम बापट यांचे दि. २ जुलै, २०१२ रोजी अल्प आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते.

## श्री. दारासिंग रंधावा

कुस्तीच्या आखाडयात भारताचा झेंडा फडकवणारे जगप्रसिध्द फ्रीस्टाइल कुस्तीवीर, रूस्तम ए हिंद आणि अभिनेते श्री. दारासिंग रंधावा यांचे दि. १२ जुलै, २०१२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

## श्री. राजेश खन्ना

लोकसभेचे माजी खासदार व बॉलिवूडचे सुपरस्टार श्री. राजेश खन्ना यांचे दि. १८ जुलै, २०१२ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६९ वर्षांचे होते. श्री. राजेश खन्ना यांनी आपल्या कारकिर्दीत जवळपास १६३ सिनेमामध्ये कामे केली.

श्री. राजेश खन्ना यांच्या अभूतपूर्व लोकप्रियतेमुळे मुंबई विद्यापीठाने 'द करिश्मा ऑफ राजेश खन्ना' या नावाचा धडा शालेय पुस्तकात समाविष्ठ केला होता. श्री. राजेश खन्ना यांना १९९५ साली कलारत्न पुरस्कार व २००५ साली फिल्मफेअरचा जीवनगौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले होते.

## श्री. बाळासाहेब श्रीपती तथा बाळ पळसुले

ज्येष्ठ संगीतकार श्री. बाळासाहेब श्रीपती तथा बाळ पळसुले यांचे दि. ३० जुलै, २०१२ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. श्री. बाळ पळसुळे यांनी १५० हून अधिक चित्रपटांसाठी संगीत दिले. दादासाहेब फाळके अकादमीने २०१० साली त्यांना चित्रकर्मी सन्मान बहाल केला होता.

## प्रा. स. पां. देशपांडे

नामवंत गणितज्ञ प्रा. स. पां. देशपांडे यांचे दि. १० सप्टेंबर, २०१२ रोजी ह्दयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते. पुणे व मुंबईतील विविध महाविद्यालयांमध्ये त्यांनी अध्यापन केले होते.

## श्री. मनोहर बोर्डेकर

ख्यातनाम मुद्रितशोधक, साहित्यिक व पत्रकार श्री. मनोहर बोर्डेकर यांचे दि. १० सप्टेंबर, २०१२ रोजी ह्दयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते. पुणे व मुंबईतील विविध महाविद्यालयांमध्ये त्यांनी अध्यापन केले होते.

## श्री. बाबासाहेब कुपेकर

विधानसभेचे माजी अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार श्री. बाबासाहेब कुपेकर यांचे दि. २६ सप्टेंबर, २०१२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७० वर्षांचे होते.

## श्रीमती काशिबाई बाबुराव शेटे

मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे प्रमुख कार्यवाह श्री. संजय बाबुराव शेटे यांच्या मातोश्री आणि मंडळाच्या जडणघडणीत वैशिष्टपूर्ण योगदान देणारे कै. बाबूरावजी शेटे यांच्या अर्धांगिनी श्रीमती काशिबाई बाबुराव शेटे यांचे दि. १२ मे, २०१२ रोजी दु:खद निधन झाले.

## श्री. वासूदेव श्रीनिवास पंडित व श्रीमती प्रमिला वासूदेव पंडित

व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. गुरूनाथ पंडित यांचे वडील श्री. वासूदेव पंडित यांचे दि. १३ जून, २०१२ रोजी व आई श्रीमती प्रमिला पंडित यांचे दि. २७ सप्टेंबर, २०१२ रोजी दुःखद निधन झाले.

## श्री. भालचंद्र अनंत जोशी

व्यवस्थापन परीषदेचे सदस्य डॉ. विजय भालचंद्र जोशी यांचे वडील श्री. भालचंद्र अनंत जोशी यांचे दिनांक १५ जुलै, २०१२ रोजी दुःखद निधन झाले.

## श्रीमती पार्वती भगवान खैरे

मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव श्री. कुमार खैरे यांच्या मातोश्री श्रीमती पार्वती भगवान खैरे यांचे दि. ८ ऑगस्ट, २०१२ रोजी दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७३ वर्षाचे होते.

## श्री. दिग्विजय खानविलकर

राज्याचे माजी आरोग्यमंत्री व करवीर विधानसभा मतदारसंघाचे तब्बल २५ वर्षे प्रतिनिधित्व केलेले श्री. दिग्विजय खानविलकर यांचे दि. ९ ऑगस्ट, २०१२ रोजी ह्रदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६० वर्षाचे होते.

## श्री. विलासराव देशमुख

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या चार दशकांहून अधिक काळ महत्वाची भूमिका बजावणारे काँग्रेस नेते, केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञानमंत्री आणि माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांचे दि. १४ ऑगस्ट, २०१२ रोजी आजारामुळे निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षाचे होते.

## श्री. प्रभाकर कुंटे

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, काँग्रेस नेते व माजी मंत्री श्री. प्रभाकर कुंटे यांचे दि. १५ ऑगस्ट, २०१२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षाचे होते. सन १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी महत्वाची कामगिरी बजावली होती. सन १९७२ मधून धारावी मतदारसंघातून ते विधानसभेवर निवडून आले होते. तसेच म्हाडाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

### पं. मनोहरराव चिमोटे

ज्येष्ठ संवादिनीवादक आणि संगीततज्ञ पं. मनोहरराव चिमोटे यांचे दि. ८ सप्टेंबर, २०१२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते. संवादिनी केवळ साथसंगतीचे वाद्य म्हणून प्रचलित असताना पं. चिमोटे यांनी १९७७ रोजी स्वतंत्र संवादिनीवादनाचे कार्यक्रम आयोजित करून या वाद्याला स्वतंत्र दर्जा प्राप्त करून दिला होता.

### डॉ. व्हर्गिस कुरियन

भारतातील धवलक्रांतीचे प्रणेते तसेच गुजरात येथील 'अमूल डेअरी' चे संस्थापक डॉ. व्हर्गिस कुरियन यांचे दि. ९ सप्टेंबर, २०१२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

### श्रीमती. मृणालताई गोरे

सामाजिक चळवळीत 'पाणीवाली बाई' म्हणून प्रसिध्द असलेल्या ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आणि ज्येष्ठ समाजवादी नेत्या श्रीमती मृणालताई गोरे यांचे दि. १७ जुलै, २०१२ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८५ वर्षांच्या होत्या.

### श्री. शंकरराव जगताप

श्री. शंकरराव जगताप यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले श्री. शंकरराव जगताप हे विधान परिषदेचे अध्यक्ष होते.

### श्री. ए. के. हंगल

श्री. ए. के. हंगल यांचे दिनांक २६ ऑगस्ट, २०१२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी ते ९५ वर्षांचे होते. त्यांनी २२५ हिंदी सिनेमामध्ये कामे केली व त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविले होते.

- **नविन सदस्यांचे विद्यापीठातर्फे व अधिसभा सदस्यांतर्फे स्वागत :-**

मुंबई विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू पदी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(सी) अन्वये डॉ. नरेश चंद्र व कुलसचिव पदी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(ओ) अन्वये श्री. कुमार खैरे यांची नेमणूक झाल्याबद्दल अधिसभेतर्फे त्यांचे अभिनंदन.

## ➢ अभिनंदन -

➢ दि. २१ एप्रिल २०१२ रोजी देशभरातील उच्चशिक्षण संस्थाना नामांकन देणा-या बंगलोर येथील नॅशनल असेसमेंट ॲण्ड ॲक्रेडिएशन कौन्सिलने (नॅक) मुंबई विद्यापीठास 'ए' दर्जा देण्यात आल्याचा निर्णय जाहिर करण्यात आला आहे. १६ सप्टेंबर, २०१२ रोजी त्यांचे सर्टीफिकेट आपल्याला प्राप्त झाले.

➢ मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख प्रा. गणेश चंदनशिवे यांना 'लोकरंगभूमीवरील तमाशाच्या सादरीकरणाचे बदलते स्वरूप : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी पदवी बहाल करण्यात आली आहे.

➢ मुंबई विद्यापीठातील ॲकडमी ऑफ थिएटर आर्टसचे संचालक प्रा. वामन केंद्रे यांना बीड येथील अखिल भारतीय मराठी नाटय परिषद शाखेतर्फे या वर्षापासून सुरू करण्यात येत असलेल्या स्व. डॉ. सुहासिनी इर्लेकर नाटय-पुरस्कारासाठी ज्येष्ठ रंगकर्मी म्हणून त्यांची निवड करण्यात आली.

➢ मुंबई विद्यापीठातील सुरक्षा संदर्भातील उपाययोजनेअंतर्गत मुंबई विद्यापीठातील पाच सुरक्षा रक्षकांना दि. २३ ते ३० जुलै, २०१२ या कालावधीत नागरी संरक्षण प्रशिक्षण महाविद्यालय, मुंबई येथे ''फायर फायटींग'' प्रशिक्षणाकरीता पाठविण्यात आले होते. प्रशिक्षण पूर्ण करणा-या सुरक्षा रक्षकांची नावे - श्री. सुरेश शांताराम पवार, श्री. रोहीदास नामदेव वंडेकर, श्री. मारूती विष्णु मोरे, श्री. समीर सुभाष राऊळ, श्री. सचीन भगवान रूके या पाचही सुरक्षा रक्षकांनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

➢ महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने मुंबई विद्यापीठातील संस्कृत विभागाच्या विभागप्रमुख डॉ. उमा वैद्य व रूईया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पेडणेकर यांना ना. पालकमंत्री जयंत पाटील यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

➢ मुंबई विद्यापीठाच्यावतीने शिक्षकदिनानिमित्त खालील विविध पुरस्कार आदर्श शिक्षकांना प्रदान करण्यात आले.

अ. श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार सन २०११-२०१२.

१. शहरी विभाग - श्रीमती पी.पी. टोकेकर, राज्यशास्त्र विषयाच्या सहायक प्राध्यापिका, कं.ग.जोशी कला महाविद्यालय आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, ठाणे.

२. ग्रामीण विभाग - श्रीमती अंजली सुधीर पुराणिक, रसायनशास्त्र विषयाच्या सहायक प्राध्यापिका, शेठ ज.नौ. पालीवाला वाणिज्य, कला व विज्ञान महाविद्यालय, पाली, सुधागड.

ब. आदर्श शिक्षक पुरस्कार सन २०११-२०१२.

१. विद्यापीठ विभाग - डॉ. डॉली सनी, प्राध्यापिका, अर्थशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी.

२. शहरी विभाग - डॉ. विकास वि. गोलटकर, वनस्पती विषयाचे सहयोगी प्राध्यापक, डी. जी. रूपारेल विज्ञान, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, माहिम.

विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या विविध महाविद्यालयांना 'अ' दर्जा प्राप्त झालेला आहे. अशा सर्व महाविद्यालयांना आणि त्यांचे री-अॅक्रीडीटेशन किंवा अॅक्रीडीटेशन झालेले आहे त्यांचेही अभिनंदन.

**बाब क्रमांक १ :- दिनांक २८ व २९ मार्च, २०१२ रोजी झालेल्या वार्षिक अधिसभेचे इतिवृत्त मंजूर करणे.**

सर्वप्रथम कुलगुरूंनी इतिवृत्त तयार करण्यासाठी नेमलेल्या समिती सदस्यांनी त्यांचा वेळ देऊन इतिवृत्त तयार केले त्याबद्दल सन्माननीय समिती सदस्यांना धन्यवाद दिले व इतिवृत्तावर काही सूचना असतील तर त्या सन्माननीय सदस्यांनी मांडाव्यात अशी कुलगुरूंनी विनंती केली.

| पृष्ठ क्र. | परिच्छेद क्र. | ओळ क्र. | च्या ऐवजी | असे वाचावे |
|---|---|---|---|---|
| २ | - | १५ | प्राचार्य एम. एस. कु-हाडे | प्राचार्य एम. एस. कु-हाडे, सदस्य सचिव |
| १० | १ | १ व २ | श्री. दिलीप करंडे म्हणाले की, एक अत्यंत महत्वाची घटना आहे, त्याची नोंद केली गेली नाही. कौतुकास्पद गोष्ट आहे. अत्यंत महत्वाची आहे. | श्री. दिलीप करंडे म्हणाले की, एक अत्यंत कौतुकास्पद महत्वाची घटना आहे, त्याची नोंद केली गेली नाही. |
| १२ | १ | ६ | पोहचणार | पोहचविणार |
| १३ | ४ | २ | अभ्यासक्रच्या | अभ्यासक्रमाच्या |
| १४ | ६ | ३ | शुल्क आपण परत करणार का? | शुल्क आपण परत करणार का? असा प्रश्न उपस्थित केला. |
| १७ | २ | १ | The Vice Chancellor further informed | The Vice Chancellor informed |
| १७ | २ | ३ ते ५ | We will take the members from all the stake holders in the committee and we will prepare a white paper has white paper and we | We will take the members from all the stake holders in the committee and we will prepare a white paper and we will take the corrective action |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | will discuss and we will take the corrective action and now I move on item No.1 | |
| १७ | ८ | ६ | regarding | according |
| १८ | २ | ७ | मुदा | मुद्दा |
| २० | ६ | २ | angles | anguish |
| २० | ६ | ३ | restruction | repercussions |
| २० | ६ | ४ | governors | governance |
| २२ | २ | ३० | DTLT | DT/NT |
| २५ | १ | ४ | AICT | AICTE |
| २६ | ४ | ९ | will talking | will be talking |
| २७ | २ | ४ | your | you |
| ३२ | २ | १ | आज वृत्तपत्रांमध्ये | आज दिनांक २९ मार्च, २०१२ रोजी वृत्तपत्रांमध्ये |
| ३२ | २ | २ | आज | आजचा |
| ३४ | २ | ३ | कार्यवाही | कारवाई |
| ३६ | ४ | ८ | years | Hours |
| ३७ | ४ | ३ | आजचा पेपर | आजचा दिनांक २९ मार्च, २०१२ रोजीचा पेपर |
| ३८ | १ | १४ | आजचाही पेपर | आजचा दिनांक २९ मार्च, २०१२ रोजीचा पेपर |
| ४२ | १ | १० | kaliana | kalina |
| ४३ | ५ | ३ | Institute | हा शब्द वगळण्यात यावा |
| ४४ | १ | १४ | 1 lakhs | 10 lakhs |
| ४७ | ४ | १ | Vice-Chancellor | Vice-Chancellor informed the house |
| ४७ | ४ | १ | coaching this staff | coaching and added that this task |
| ५० | १ | ३ | रू. १०,२५००/- | रू. १०,२०,५००/- |
| ५२ | १ | १ | assessing | assessment |
| ५२ | १ | २ | find year | second year |
| ५४ | १ | ३ | अद्ययावते | अद्ययावत |
| ५६ | १ | १ | Dr. (Smt.) Kamala Balasubramaniam | Prin. (Smt.) Kamala Balasubramaniam |
| ५८ | १ | २ | एम.एम.सी. | एल.एम.सी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६६ | ३ | १० | passed | pass |
| ६६ | ४ | ४ | auditory | auditor |
| ६६ | ४ | ४ | objection | objections |
| ६६ | ४ | ७ | will | we |
| ६६ | | | बाब क्र.४ च्या अगोदर सोबतचा परिच्छेद वाचावा. | महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम २८(ई) ला अनुसरून व्यवस्थापन परिषदेने सादर केलेल्या वार्षिक वित्तिय विवरणाचा (ज्यात २०१२-२०१३ या वर्षाचा अर्थसंकल्पीय अंदाज तसेच २०११-२०१२ सालासाठीचा सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज यांचा समावेश आहे.) याचा विचार अधिसभेने करून मान्य केला त्याचप्रमाणे वार्षिक वित्तिय विवरणामध्ये तपशीलवार दिलेले २०१२-२०१३ सालासाठीचे अर्थसंकल्पीय अंदाज तसेच २०११-२०१२ सालासाठीचे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज विचारात घेऊन अधिसभेने स्वीकृत आणि संमत केले. |

वरील सुधारणांसह दिनांक २८ व २९ मार्च, २०१२ रोजी झालेल्या वार्षिक अधिसभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

**बाब क्र. २:- विद्वत् सभेच्या दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये पुढील पाच शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ ते २०१७-२०१८ साठी बृहत आराखडा अद्ययावत करण्यासंबंधी केलेल्या शिफारशी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(१) अन्वये अधिसभेच्या बैठकीपुढे ठेवण्यात येत आहेत.**

प्राचार्य (डॉ.) राजपाल एस्. हांडे, संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांनी व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनुसार पुढील ठरावाची सूचना दिली त्यास प्राचार्य सिद्धेश्वर टी. गडदे यांनी अनुमोदन दिले:-

शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ ते २०१७-२०१८ साठी बृहत आराखडा अद्ययावत करण्यासंबंधी केलेल्या शिफारशी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(१) अन्वये अधिसभेने नोंद घ्यावी.

चर्चेअंती अधिसभेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(१) नुसार विद्वत सभेने केलेल्या शिफारशीसह शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ ते २०१७-२०१८ साठी तयार केलेल्या बृहत आराखडयाची खालील सुधारणासहित नोंद घेतली व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ३६(२) नुसार तो अद्ययावत बृहत आराखडा राज्य उच्च शिक्षण परिषद व मा. कुलपतींना सादर करण्याच्या सूचना केल्या.

| ठिकाण | प्रस्तावित महाविद्यालये |
|---|---|
| १. अंधेरी ते बोरीवली- | व्यवस्थापन अभ्यास महाविद्यालय, |
| २. जि.ठाणे (ग्रामीण), रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग- | विधी महाविद्यालय. |

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

मुंबई- -४०० ०३२
०६ फेब्रुवारी, २०१३.

कुमार खैरे
कुलसचिव